# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.७४/२०१९

| | | |
|---|---|---|
| १. श्री.पोतेकर उमेश प्रकाश<br>मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा. | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. डी.एस.शिक्षण संस्था, पाचगणी,<br>ता.महाबळेश्वर, जि.सातारा.<br><br>२. श्री.भिमराव शिंदे कला, वाणिज्य,<br>व विज्ञान महिला महाविद्यालय, वाई,<br>ता. वाई, जि.सातारा. | } | वि.प. |

## तक्रार अर्ज क्रं.७५/२०१९

| | | |
|---|---|---|
| २. सपकळ महेश दाजिराम<br>मु.पो.मठाचीवाडी, ता.फलटण, जि.सातारा. | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. डी.एस.शिक्षण संस्था, पाचगणी,<br>ता.महाबळेश्वर, जि.सातारा.<br><br>२. श्री.भिमराव शिंदे कला, वाणिज्य,<br>व विज्ञान महिला महाविद्यालय, वाई,<br>ता. वाई, जि.सातारा. | } | वि.प. |

डी.एस.शिक्षण संस्था, पाचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा यांचे श्री. भिमराव शिंदे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, वाई, ता.वाई, जि.सातारा यांचेकडील शिक्षक श्री.पोतेकर उमेश प्रकाश व श्री.सपकळ महेश दाजीराम यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२०/०६/२०१९ रोजी स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केले आहेत. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदार यांची दि. ०९ मे २०१७ रोजीच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत श्री.भिमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई मध्ये श्री. पोतेकर यांची भूगोल तसेच श्री. सपकळ यांची हिंदी विषयाच्या सहायक प्राध्यापकपदी निवड होवून श्री.पोतेकर हे संस्थेच्या जा.क्र.१३४८/२०१७ व श्री.सपकळ हे संस्थेच्या जा.क्र.१३५०/२०१७ दि.१६/१०/२०१७ रोजीच्या नियुक्ती आदेशानुसार दि.०६/११/२०१७ रोजी महाविद्यालयात रूजू झाले व दि.०६/११/२०१८ रोजी विद्यापीठ नियमानुसार तक्रारदार यांचा एक वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण होवून तक्रारदार हे महाविद्यालयामध्ये सेवेत कायम (Deemed confirm) झाले. मी सेवेत कायम झाल्यानंतर तब्बल ६ महिने व १८ दिवसांनी दि.२४.०५.२०१९ रोजी संस्थेने तक्रारदार यांना परिविक्षाधीन कालावधी १ वर्षाने वाढविल्याचे श्री.पोतेकर यांना जा.क्रं.

१८२५/२०१९ व श्री.सपकळ यांना जा.क्र.१८२४/२०१९ दि.२४.०५.२०१९ चे पत्र पाठविले आहे. हे पत्र विद्यापीठ नियमांचे उल्लंघन करणारे, बेकादेशीर व चुकीचे असल्यामुळे संबधित आदेश रद्द करण्यात यावे अशी विनंती तक्रारदार यांनी केली आहे.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

संस्था व महाविद्यालयाने सदर तक्रारीबाबत कोणताही अभिप्राय दिलेला नाही.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार व गैरअर्जदार दोघेही गैरहजर. उभय पक्षकारांना आज हजर राहणे करिता नोटीस काढणेत आल्या होत्या. तक्रारदारांनी दि.०६.०९.२०२३ रोजी समितीला ई-मेलने पाठविलेले आहेत त्यात त्यांनी या प्रकरणात उपस्थित केलेल्या बाबींबाबत मे.विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणासमोर अपील दाखल केले असलेचे कबुल केले असुन मागील तारखेस त्यांना समितीतर्फे या समितीपुढे प्रकरण चालणेस पात्र नाही याची समज देण्यात आली होती. त्याप्रमाणे त्यांनी मे.विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणापूढे प्रलबिंत असलेले अपील चालवित असलेचे या समितीस कळविलेले आहे. त्यामुळे तक्रारदार जाणुनबुजून हया समितीसमोर गैरहजर राहिलेले दिसत आहेत. तसेही पाहता मे.विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणासमोर प्रलंबीत असलेल्या प्रकरणामुळेही हया समितीस सदरची तक्रार चालविता येत नसलेनेही तक्रार खारीज करण्यास पात्र आहे असे या समितीचे नम्र मत आहे.

**आदेश**

तक्रार खारीज करण्यात येत आहे.

दिनांक : 27 SEP 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोळेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.